
फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई - ४०० ०२८.

दूरध्वनी : २४२२ ३५ ८९ / २४२१ ९० ११

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)




# वार्षिक अहवाल

(१ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६)




जोड जिल्हा खोखो स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी श्री. अरुण राव यांचे स्वागत करताना मंडळाचे विश्वस्त श्री. दिनकर पाटील



वसंतव्याख्यानमालेत २१ एप्रिल ०५ रोजी डॉ. अरुण सावंत (कुलगुरु मुंबई विद्यापीठ) यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना मंडळाचे कार्यकारिणी सदस्य श्री. चारुदत्त थरवल.




प्रेक्षक न्यायाधीश एकांकिका स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुण्या श्रीमती आशालता यांचा गौरव करताना मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर



प्रेक्षक न्यायाधीश एकांकिका स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी डावीकडून मंडळाचे विश्वस्त ॲड. मुकुंदराव तिवरेकर अध्यक्ष वसंत भालेकर, दादरभूषण प्रकाशभाई मोहाडीकर, मा. श्री. अशोक प्रधान, विश्वस्त श्रीमती उषा मेहता आणि प्रमुख पाहुण्या आशालता



जोड जिल्हा खोखो स्पर्धेचे उद्‌घाटन करताना श्री. अरुण केदार आणि त्यांच्या सोबत श्री. अरुण राव



जोड जिल्हा खोखो स्पर्धेतील एक सनसनाटी क्षण

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२४/१२/२००६ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन् २००५ - २००६ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन् २००५ - २००६ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन् २००६-२००७ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन् २००६-२००७ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.

७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दि.२६/११/२००६

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

उमेश व्यं. शेणॉय

कार्यवाह

सूचना :

१. ज्या सभासदांना काही प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरूपात शनिवार दिनांक १६/१२/२००६ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान (रविवार सोडून) आणून द्यावेत.

२. ज्या सभासदांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी त्यांचे बदललेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी/संबंधितांनी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरित कळवावी.

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६

### ★ विश्वस्त ★

श्री. दिनकर पाटील — ॲड. श्री. मुकुंद तिवरेकर

श्रीमती उषा मेहता

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | श्री. वसंत भालेकर |
| **उपाध्यक्ष** | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | मेजर श्री. विजय अडसुळे |
| **कार्याध्यक्ष** | : | श्री. चिंतामणी नागले |
| **कार्योपाध्यक्ष** | : | श्री. अरुण देशपांडे |
| **कार्यवाह** | : | श्री. उमेश शेणॉय |
| **सहकार्यवाह** | : | श्री. सतीश रेडीज |
| **कोषाध्यक्ष** | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| **सदस्य** | : | श्री. भास्कर केरकर |
| | | श्री. चारुदत्त थरवल |
| | | श्री. दिपक पडते |
| | | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | डॉ. स्नेहल बिर्जे |
| **सदस्य (स्वीकृत)** | : | श्री. दत्ता सावंत |
| **सदस्य (स्वीकृत)** | : | श्री. प्रफुल्ल पाटील |

# वार्षिक अहवाल
## (दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे

मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत देखील मंडळाची आर्थिक बाजू अतिशय मजबूत असून क्रीडा, कला, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यात मंडळ सतत अग्रेसर राहून कार्य करीत आहे हे सर्वश्रुत आहेच. या सर्व कार्यात आपला पाठींबा व प्रोत्साहन सतत आमच्या सोबत आहे. म्हणूनच हे सर्व करणे आम्हास शक्य होत आहे याची नोंद आम्ही कृतज्ञतापूर्वक घेतलेली आहे.

मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**सभा :** वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या ९ सभा झाल्या तर कार्यकारी समिती व विश्वस्त यांच्या ४ संयुक्त सभा झाल्या. (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट 'अ' पाहा).

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २३ ऑक्टोबर २००५ रोजी पार पडली या सभेस एकूण २४ तहहयात सभासद उपस्थित होते.

**विभागवारी निधी** : अहवाल काळांत कलाविभाग निधी व क्रीडा विभाग निधी यात प्रत्येकी रू. ३,००,००० /- (रूपये तीन लाख फक्त) व हिरक महोत्सव निधीत रु. ६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था** : १ जुलै २००५ ते ३१ डिसेंबर २००५ या कालावधीसाठी 'अमित केटरर्स' यांना ठेकेदारीची मुदत वाढवून देण्यात आली. त्यानंतर १ जानेवारी २००६ ते ३१ डिसेंबर २००६ या कालावधीसाठी निविदा मागवून 'अमित केटरर्स' यांनाच संपूर्ण केटरिंग व्यवस्थेसाठी मुक्रर करण्यात आले.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ५८ वी वसंत व्याख्यानमाला रविवार, दिनांक १८ एप्रिल ते २४ एप्रिल २००५ या दरम्यान मोठ्या दिमाखांत पार पाडली. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन गोव्याचे भूतपूर्व शिक्षणमंत्री व माजी खासदार सन्माननीय प्रा. गोपाळराव मयेकर यांच्या **'पसायदानाची अपूर्वाई'** या बहुचर्चित विषयाने झाले तर समारोप रविवार, दिनांक २४ एप्रिल २००५ रोजी विख्यात लेखिका श्रीमती संजीवनी खरे यांच्या **'प्यारा दुष्मन'** या ज्वलंत विषयाने करण्यांत आला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट 'आ' पहा).

## इतर कार्यक्रम

★ सौ. कविता व विंग कमांडर श्री. अनिल गाडगीळ या वीर मातापित्यांचा जाहीर सत्कार दि. ४ एप्रिल २००५ रोजी मंडळाच्या पटांगणात करण्यात आला. याप्रसंगी त्यांची भावपूर्ण मुलाखत प्रसिद्ध निवेदक श्री. भाऊ मराठे यांनी घेतली.

★ दिनांक ५ जून २००५ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ या दरम्यान 'मंडळ' व 'रंगवल्ली परिवार' ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सामूहिक रांगोळी' एक दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले.

★ दिनांक २६ जून २००५ रोजी 'मंडळ', 'मुंबई मराठी पत्रकार संघटना' आणि 'ओढ हिरवळीची प्रकाशन गृह' यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्रिकेट कोचिंग' - कला, व्यवसाय की धंदा' यावरील परिसंवाद घेण्यात आला. यांत सर्वश्री द्वारकानाथ संझगिरी, मकरंद वायंगणकर, लालचंद राजपूत, रत्नाकर शेट्टी, विलास गोडबोले इ. क्रिकेट जगतातील प्रसिद्ध व्यक्तिंनी भाग घेवून वेगळीच रंगत आणली.

★ भारतीय स्वातंत्र्याचा ५८ वा वर्धापन दिन सोमवार, दि. १५ ऑगस्ट २००५ रोजी ज्येष्ठ व श्रेष्ठ स्वातंत्र्य सैनिक मा. श्री. रामभाऊ उर्फ अण्णासाहेब मोहाडीकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाने तसेच त्यांच्या स्वातंत्र्य युद्धातील आठवणीने करण्यात आला. या प्रसंगी सुप्रसिद्ध बाल चित्रकार कु. हिमालय महेश पाटकर याचा पाहुण्यांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात आला. तसेच २००४-०५ च्या वार्षिक परिक्षेत उत्तम यश संपादन केलेल्या मंडळाच्या गुणवंत खेळाडूंचे कौतुक समारंभाच्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

★ मंगळवार, दिनांक ३० ऑगस्ट २००५ रोजी पेणच्या 'संस्कृती' महिला मंडळाच्या हौशी महिलांच्या मंगळागौरीचे खेळ - फुगड्या झिम्मा, गाणी, नाचगाणी हा कार्यक्रम सादर करण्यांत आला. या कार्यक्रमास महिलांची बरीच गर्दी होती.

★ दिनांक २३ ऑक्टोबर २००५ रोजी मंडळाचे माजी कलाविभाग प्रमुख व मार्गदर्शक श्री. विनोद हडप यांच्या अकाली निधनानिमित्त त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मंडळाच्यावतीने एक शोकसभा आयोजित करण्यात आली होती. यास अनेक मान्यवर उपस्थित होते.

★ दि. १६ डिसेंबर २००५ रोजी 'मंडळ' व 'ओढ हिरवळीची' प्रकाशन गृह यांच्या संयुक्त विद्यमाने 'युरोप मधील क्रीडा सुविधा आणि भारत' या विषयावर भारतीय क्रिकेटचे यशस्वी माजी कर्णधार मा. श्री. अजित वाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद आयोजित करण्यांत आला होता. याप्रसंगी मुंबईचे महापौर मा. श्री. दत्ता दळवी यांच्याबरोबरच अनेक क्रीडा पत्रकार उपस्थित होते.

★ गुरुवार दिनांक २६ जानेवारी २००६ रोजी सकाळी प्रजासत्ताक दिनानिमित्त कामगारांचे लोकप्रिय पुढारी, ज्येष्ठ समाजसेवक व महाराष्ट्र राज्याचे भूतपूर्व गृहनिर्माण मंत्री मा. वसंतरावजी होशिंग यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला तर संध्याकाळी 'मंडळाच्या' ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक कै. वसंत प्रभू यांच्या सुपरहिट गाण्याचा कार्यक्रम 'पंचमी' निर्मित 'तेथे स्वर माझे जुळती' आयोजित करण्यात आला. यावेळी कै. वसंत प्रभू यांच्या कुटुंबियांचे यथोचित सत्कार ही मंडळाच्या वतीने करण्यांत आला.

★ रविवार दि. १९ मार्च २००६ रोजी 'ई मर्क फार्मा लिमिटेड' व 'मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मधुमेह शिबीर आयोजित करण्यात आले होते. यांत सहभागी झालेल्यांना डॉ. मनिषा तालिम, डॉ. एस. एम. बोरकर व डॉ. स्नेहल बिर्जे यांनी मार्गदर्शन केले व यथायोग्य सल्ले दिले.

★ गुरुवार दि. २३ मार्च २००६ रोजी ३५ वे विश्वविक्रमी कसोटी शतक केल्याबद्दल प्रसिद्ध मराठी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याचा भारतरत्न मा. लता मंगेशकर यांच्या हस्ते सोन्याची बॅट देवून यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे भव्य सत्कार करण्यांत आला. तसेच या प्रसंगी ज्येष्ठ क्रीडा पत्रकारांचा समिक्षकांचा सत्कारही करण्यात आला. यात मंडळाचे उपाध्यक्ष (क्रीडा प्रमुख) श्री. रमेश वरळीकर यांचाही समावेश होता.सदर नेत्रदिपक कार्यक्रम 'मराठी क्रीडा पत्रकार' 'ओढ हिरवळीची' प्रकाशन गृह व 'अमर हिंद मंडळ' यांच्या संयुक्त सहकार्याने सादर झाला.

## इतर संकीर्ण

★ खेळाडूंना दुखापत झाल्यास त्यांना योग्य ती औषधोपचार करण्यासाठी मदत मिळावी यासाठी रु. २५०००/- क्रीडा विभाग निधीतून राखीव ठेवण्याचा ठराव करण्यांत आला.

★ पाण्याच्या टाक्या साफ करणे, पत्र्यांवर डांबर टाकून घेणे, दरवाज्यांची दुरुस्ती, हॉलची दुरुस्ती, रंगरंगोटी इ. कामे अहवाल काळात करुन घेण्यात आली.

★ अहवालकाळात कर्मचाऱ्यांना पगारवाढ देण्यात येवून प्रतिवर्षी एप्रिल महिन्यांत प्रत्येकी रु. २००/- पगारवाढ देण्याचे ठराव करण्यांत आला.

★ प्रतिवर्षी मंडळाचे माजी अध्यक्ष 'कै. मधुकर अ. फडके' यांच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थांना त्यांच्या नांवे बक्षिसे देवून सत्कार करण्याचा ठराव करण्यांत आला.

★ आकस्मिक संकट प्रसंगी अडचणींत सापडलेल्यांची विनामूल्य सोय मंडळात करण्याचा ठराव करण्यात आला.

★ मंडळाचे एक हितचिंतक श्री. आर. एस. राजाध्यक्ष यांनी मंडळातील खेळाडूंना व्यायामासाठी सायकल भेट दिली.

★ प्रतिवर्षाप्रमाणे तहह्यात सभासद आजी/माजी खेळाडू हितचिंतक यांना दिवाळीची भेटकार्डे मंडळाच्या वतीने पाठविण्यांत आली.

★ बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, विंझाई देवस्थान मंडळ, अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला, इंडियन असो फॉर हॅण्डीकॅप, दादर जैन पौषधशाळा, स्नेहांकित हेल्पलाईन, निर्मिती बहिःशाल मुक्त विद्यापीठ. डॉ. मधुकर बळवंत राऊत जन्मशताब्दी समिती, ब्रह्मविद्या साधक संध, पाठारे क्षत्रिय होलिकोत्सव संघ इ. अनेक संस्थांना विनामूल्य वा सवलतीच्या दरांत त्यांच्या कार्यक्रमासाठी मंडळाची जागा अहवालकाळांत उपलब्ध करुन देण्यात आली.

★ मंडळाचे माजी विश्वस्त कै. एकनाथ साटम यांच्या कुटुंबियाच्या मदतीसाठी तसेच मंडळाचे कलाविभागाचे आधारस्तंभ माजी कलाविभाग प्रमुख श्री. विनोद हडप यांच्या प्रदीर्घ आजारांत औषधोपचारासाठी प्रत्येकी रु. २५०००/- (पंचवीस हजाराचा) निधी वर्ग करण्यात आला.

★ नॅशनल सोसायटी फॉर दि ब्लाईंड या संस्थेच्या आवाहनानुसार फोल्डींग केन्स (काठ्या) घेण्यासाठी रु. १०००/- ची मदत देण्या आली.

## विशेष अभिनंदनीय

★ मंडळाच्या विश्वस्त श्रीमती उषा मेहता यांचा 'काव्यपूर्व' हा संग्रह अहवाल काळांत प्रकाशित झाला.

---

## श्रद्धांजली

मंडळाचे माजी कलाविभाग प्रमुख व मार्गदर्शक श्री. विनोद हडप तसेच मंडळाचे हितचिंतक माजी केंन्द्रीय मंत्री मा. श्री. मधु दंडवते यांचे अहवाल काळांत देहवसान झाले. त्यांना तसेच ज्ञात अज्ञात सभासद व हितचिंतक जे काळाच्या पडद्याआड गेले त्यांना मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने<br>
उमेश व्यं. शेणॉय<br>
कार्यवाह

# क्रीडा विभाग

**कबड्डी :** फेब्रुवारी २००६ मध्ये ना. म. जोशी मार्ग येथील 'शिव शंकर उत्सव मंडळ' या संस्थेच्या राज्य-स्तरीय कबड्डी स्पर्धेतील पुरुष व महिला या दोन्ही विभागाची अजिंक्यपदे आणि चार वैयक्तिक पारितोषिक निर्विवादपणे पटकावून अमर हिंद मंडळाच्या खेळाडूंनी नवा इतिहास घडविला.

मंडळाच्या पुरुष संघाने मावळी मंडळ (ठाणे), नाशिक महापौर चषक या राज्य स्तरीय आणि विजय क्रीडा मंडळ (माझगांव) व तरुण बाल मित्र मंडळ (चेंबूर) या जिल्हा स्तरीय स्पर्धांची अशी एकूण चार अजिंक्यपदे संपादन करुन भीम पराक्रम केला आहे.

पुरुष खेळाडूंप्रमाणेच मंडळाच्या महिला खेळाडूंनीही असाच उल्लेखनीय पराक्रम केला आहे. प्रभादेवी येथील ओम विद्यार्थी क्री. मं. आणि भोईवाडाची 'शिवशंकर सेवा मंडळ' या दोन्ही स्थानिक स्पर्धांची अजिंक्यपदे पटकाविली तसेच रत्नागिरी येथे झालेल्या राज्यअजिंक्यपद स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

<u>विविध स्पर्धांतून उत्तम खेळाचे प्रदर्शन केल्याबद्दल मंडळाच्या पुढील खेळाडूंचा खास पारितोषिके देऊन गुणगौरव झाला</u> :- कुणाल यादव, साई काळसेकर, दीपकुमार चौधरी, संकेत नलावडे, अलका पारकर, तृप्ती भाटकर, प्रियांका झेंडे आणि माधुरी पावसकर

<u>पुढील खेळाडूंची प्रातिनिधिक संघात निवड झाली</u>

| | | |
|---|---|---|
| अलका पारकर | : | मुंबई (शहर) महिला (कर्णधार)/निवडीची हॅटट्रिक केली. |
| तृप्ती भाटकर | : | मुंबई (शहर) महिला व मुंबई विद्यापीठ |
| माधुरी पावसकर | : | मुंबई (शहर) ज्युनिअर |
| | | धुळे - राज्य अजिंक्यपद स्पर्धा |
| | | कोल्हापूर - आमंत्रितांची आंतर जिल्हा स्पर्धा |
| दिप्ती पारकर | : | महाराष्ट्र शालेय संघ |
| साईनाथ काळसेकर | : | मुंबई (शहर) पुरुष |
| कमलेश नांदोस्कर | : | मुंबई (शहर) ज्युनियर |
| | | धुळे : राज्य अजिंक्यपद आंतर जिल्हा स्पर्धा |
| | | कोल्हापूर : आमंत्रितांची स्पर्धा |

## खोखो :

<u>पुढील खेळाडूंनी प्रातिनिधिक संघांचे प्रातिनिधित्व केले.</u>

| | | |
|---|---|---|
| प्रीती धुरी | : | मुंबई (शहर) महिला संघ |
| शुभदा धुरी | : | मुंबई (शहर) महिला व मुंबई विद्यापीठ संघ |
| रीचा फर्नांडीस | : | मुंबई विद्यापीठ संघ |
| अमित संत | : | मुंबई (शहर) ज्युनियर संघ |
| उत्कर्ष निंबरे | : | मुंबई (शहर) सब ज्युनियर संघ |

दैनंदिन सराव :- कबड्डी : मुले - मुली : श्री. विजय राणे

खो खो : मुली : श्री. संजय पेडणेकर, श्री. प्रफुल्ल पाटील

खो खो : मुले : श्री. जतीन टाकळे, श्री. रमेश नाटेकर

इतर विशेष :

१) 'ओम प्रकाश क्रीडा मंडळ' ताडदेव, यांच्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट शिस्तबद्ध संघ म्हणून मंडळाच्या महिला संघाचा गुणगौरव .

२) कीर्ती कॉलेज जवळील समुद्राच्या वाळूत पहिल्या 'बिच कबड्डी' स्पर्धेत मंडळाच्या महिला संघाने उद्घाटनाच्या सामन्यात विजयी सलामी नोंदवली.

३) जपानचा महिला संघ महिन्यात महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आला असताना. शिवाजी पार्क दादर येथे झालेल्या संघाच्या विरुद्ध झालेल्या प्रदर्शनीय सामन्यात मंडळाच्या अलका पारकरने मुंबईचे नेतृत्व केले होते. याच संघात तृप्ती भाटकरचाही समावेश होता.

४) मंडळाचे खो खो खेळाडू प्रसाद कांबळी व श्वेता कांबळी यांना पतियाळाच्या राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरण या संस्थेची २००४-०५ वर्षाची राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली.

५) १० मे २००५ - वर्षभरात मंडळाच्या कबड्डी खेळाडूंनी लक्षणीय पराक्रम केला, त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. समारंभाचे प्रमुख पाहुणे होते मु. शा. शि. मंडळाच्या शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गो. वि. पारगांवकर.

## जोड जिल्हे खोखो स्पर्धा दि. ४ ते ७ जानेवारी २००६

हो स्पर्धा बृहन्मुंबईतील खोखो संघासाठीच मर्यादित होती. स्पर्धेसाठी पुरुष विभागात ११ तर महिला विभागात ७ संघांना आमंत्रित केले होते. या शिवाय मंडळाचे दोन्ही संघ सहभागी करुन घेण्यात आले होते.

खास महिला विभागासाठी एक विशेष अट घातली होती की "राज्य अजिंक्यपद खोखो स्पर्धेतील खुल्या गटात जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केलेल्या खेळाडूंना या स्पर्धेत खेळता येणार नाही." स्पर्धक संघांनी ही अट मान्य करुन उत्तम प्रतिसाद दिला. अशी अट घालण्याचे विशेष कारण म्हणजे नवोदित मुलींना पुढे येण्याची संधी मिळावी व पर्यायाने मुंबईचा घसरत चाललेला दर्जा सावरला जावा.

क्रीडा पत्रकार श्री. वि. वि. करमरकर, श्री. शिवराम सोनावडेकर, श्री. सुहास जोशी आणि श्री. प्रकाश सोनावडेकर यांनी स्पर्धेला उपस्थिती राखली तसेच खास प्रतिष्ठित व्यक्तींनी भेट दिल्यामुळे कार्यकर्त्यांच्या उत्साहात भर पडली. खास करुन आमदार श्री. सदा सरवणकर, डॉ. मनोहर आदवनकर, श्री. सुहास खामकर, श्री. स्वामी समर्थ मेडीकलचे श्री प्रकाश शेटये, श्री. गिरीष शेटये, रेल्वेचे कबड्डी प्रशिक्षक श्री. प्रफुल्ल सरदेसाई आणि खो खो क्षेत्रातील अनेक आजी/माजी कार्यकर्त्यांनी भेट देऊन उपकृत केले.

या छोट्या स्पर्धेतील पारितोषिकांनी खेळाडू, संबंधित प्रशिक्षक व पंच मंडळी भारावून गेली. सर्वांनी मंडळाला मनःपूर्वक धन्यवाद देऊन गुणवत्तेचे असे कौतुक सहसा अनुभवास येत नाही असे मत व्यक्त केले.

पारितोषिकांत विशेष आकर्षण म्हणजे सांख्यिकी दृष्टीकोनातून खास चार पारितोषिके दिली गेली या कामासाठी खोखोचे सांख्यिकी तज्ञ श्री. किरण पास्टे हे रोज वसईहून येऊन आवश्यक नोंद ठेवत होते, असा हा उपक्रम खोखो स्पर्धातून प्रथमच अनुभवाला मिळाला. अशी प्रतिक्रीया खेळाडूंनी व्यक्त केली. अशी एकूण आठ पारितोषिके (चार सांघिक व चार वैयक्तिक) देण्यांत आली.

स्पर्धेचे उद्घाटन, कॅरमचे शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मानकरी मा. श्री. अरुण केदार

यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी सुप्रसिद्ध उद्योजक आणि अमृता इंण्डस्ट्रीजचे भागीदार श्री. अरुण राव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सांगता समारंभाप्रसंगी पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हीसचे सरसंचालक मा. डॉ. नयन शहा, श्री. सुभाष सराफ (सी. ए.) आणि माजी राष्ट्रीय खो खो खेळाडू श्री. सुरेंद्र (भाई) चव्हाण हे उपस्थित होते.

खोखो स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा 'एकलव्य' बहुमान पटकावल्याबद्दल मुंबईचा श्री समर्थ व्यायाम मंदिराचा खोखो खेळाडू श्री. बाबली वैद्य याचाही याप्रसंगी मंडळाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

**स्पर्धेचे निर्णय आणि पारितोषिक याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.**

# खो-खो स्पर्धेचे निर्णय :-

| | | | |
|---|---|---|---|
| पुरुष : | अंतिम विजयी | – | ओम समर्थ व्यायाम मंदिर, माटुंगा |
| | उपविजयी | – | विद्यार्थी क्रीडा केंद्र, परळ |
| | उपात्यं उपविजयी – | | १) सरस्वती स्पोर्टस क्लब, माहिम |
| | | | २) प्रबोधन, गोरेगाव |
| महिला : | अंतिम विजयी | – | परांजपे स्पोर्टस क्लब, अंधेरी |
| | उपविजयी | – | अमर हिंद मंडळ, दादर |
| | उपांत्य उपविजयी – | | १) शिवनेरी सेवा मंडळ, दादर |
| | | | २) महात्मा गांधी स्पो. अॅकेडमी, अंधेरी |

**स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू :**

अष्टपैलू – गणेश गवंडी (ओम समर्थ), पुजा परब (परांजपे स्पोर्टस्),

सरंक्षक – रंजन मोहिते (ओम समर्थ), भाग्यश्री भोसले (परांजपे स्पोर्टस् )

आक्रमक – प्रशांत इंगळे (विद्यार्थी), विशाखा गव्हाणे (अमर हिंद मंडळ)

**इतर खास पारितोषिके :**

१) लक्षवेधी खेळाडू : पुरुष – सागर मालप (विद्यार्थी)
महिला – स्नेहा म्हैसधुणे (शिवनेरी)

२) सांख्यिकी नजरेतून

कमीत कमी वेळात पहिली तुकडी बाद करणारा संघ :-
विद्यार्थी ५५ सेकंद, म. गांधी स्पो. अॅकेडमी (२ मि. ४७ से.), अनुक्रमे पुरुष व महिला संघाची ही नोंद प्रबोधन विरुद्धची आहे.

जास्तीत जास्त वेळ नोंदवणाऱ्या पहिल्या तुकडीचा संघ – शिवनेरी (नवयुवक विरुद्ध ८ मि. २० से. आणि परांजपे स्पोर्टस्–दोन सामन्यात नाबाद ९ मि.)

जास्तीत जास्त झेप टाकून गुण मिळविणारा खेळाडू – कुणाला शेजवल (प्रबोधन) ५ बळी आणि जास्तीत जास्त गुण स्तंभात टिपणारी खेळाडू – अमृता भगत (शिवनेरी) २ गुण.

# (परिशिष्ट 'अ')

## कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती

| | |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | ९ |
| २) श्री. अरूण अ. देशपांडे ( कार्योपाध्यक्ष) | ८ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ९ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सहकार्यवाह) | ८ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | ९ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ९ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ९ |
| ८) श्री. चारूदत्त शां. थरवल (सदस्य) | ७ |
| ९) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | ८ |
| १०) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ९ |
| ११) डॉ. स्नेहल मा. बिर्जे (सदस्य) | ६ |
| १२) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य स्विकृत) | ९ |
| १३) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य स्विकृत) | ८ |

(परिशिष्ट 'आ')

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५८ वे)

## कार्यक्रम पत्रिका

**सोमवार** दि. १८ एप्रिल २००५

वक्ते : प्राचार्य गोपाळराव मयेकर (गोव्याचे भूतपूर्व शिक्षणमंत्री, माजी खासदार)

विषय : 'पसायदानाची अपूर्वाई'

**मंगळवार** दि. १९ एप्रिल २००५

वक्ते : श्री. सदानंद (भाऊ) मराठे

विषय : 'भाऊचा धक्का'

**बुधवार** दि. २० एप्रिल २००५

वक्ते : डॉ. विश्वास पाटील एम. ए. पीएच. डी.

विषय : 'दांडी यात्रेचा अमृतमहोत्सव '

**गुरुवार** दि. २१ एप्रिल २००५

वक्ते : प्रा. (डॉ.) अरूण सावंत एम. एससी. पीएच. डी (प्र) कुलगुरू मुंबई विद्यापीठ

विषय : 'दमुंबईचे पर्यावरण शोध आणि बोध'

**शुक्रवार** दि. २२ एप्रिल २००५

वक्ते : श्री. अमोल शेवडे

विषय : 'नामस्मरण'

**शनिवार** दिनांक २३ एप्रिल २००५

वक्ते : डॉ. शेखर आंबर्डेकर एम. डी. (डी. एम.)

विषय " हृदयविकार "

**रविवार** दिनांक २४ एप्रिल २००५

वक्ते : श्रीमती संजीवनी खेर

विषय : " प्यारा दुष्मन "



जोड जिल्हा खोखो स्पर्धेतील एक सनसनाटी क्षण



दि. २० एप्रिल ०५ रोजी वसंत व्याख्यानमालेत डॉ. विश्वास पाटील यांच्या व्याख्यानाप्रसंगी प्रेक्षागृहात दादरभूषण श्री. प्रकाशभाई मोहाडीकर, श्री. रामभाऊ मोहाडीकर, श्री. देसाई, कार्याध्यक्ष चिंतामणी नागले अध्यक्ष वसंत भालेकर कार्यवाह उमेश शेणॉय, कोषाध्यक्ष श्रीकृष्ण राणे आणि गणेश मोंडकर



वसंत व्याख्यानमालेत दि. २४ एप्रिल ०५ रोजी व्याख्यानमालेच्या समारोपास व्यासपिठावर जाताना श्रीमती संजीवनी खेर सोबत मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर, कार्यवाह श्री. उमेश शेणॉय, कार्याध्यक्ष- चिंतामणी नागले, कार्योपाध्यक्ष अरुण देशपांडे, उपाध्यक्ष रमेश वरळीकर व विश्वस्त ॲड. मुकुंदराव तिवरेकर



वसंत व्याख्यानमालेत १९ एप्रिल ०५ रोजी व्याख्याते श्री. भाऊ मराठे यांच्या समवेत मंडळाचे कार्याध्यक्ष चिंतामणी नागले, कोषाध्यक्ष श्रीकृष्ण राणे, कार्योपाध्यक्ष अरुण देशपांडे आणि मंडळाचे अध्यक्ष वसंत भालेकर

# ऐतिहासिक पराक्रम



शिवशंकर उत्सव मंडळ (ना. म. जोशी मार्ग) यांच्यावतीने फेब्रुवारी ०६ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेची दोन्ही अजिंक्यपदे निर्विवादपणे पटकावणारे मंडळाचे पराक्रमी खेळाडू

